संरचनेचा नवा मंत्र

२६ मार्च २००५ : १० रुपये

# साप्ताहिक सकाळ

## गृहसजावट विशेषांक



साधी जीवनशैली

सौंदर्यपूर्ण अभिरूची




ग्लास टॉप, लॅमिनेट आणि रंग यांच्या वापरातून साधलेला परिणाम

अंजली अश्विन लव्हेकर

# घराचा मेक-अप !

**रंग, लॅमिनेट, विनियर, वॉलपेपर, काच, टाईल्स, आरसे, कापड, आर्टवर्क ही अंतर्गत संरचनेत वापरली जाणारी विविध माध्यमं म्हणजे तुमच्या घराचा फायनल मेकअप टच आहे. त्याची योग्य आणि अचूक निवड व्हायला हवी.**



नवीन वास्तूत प्रवेश केल्यावर ती आपल्या नातेवाइकांनी, मित्र-मैत्रिणींनी येऊन पाहावी व त्याचे कौतुक करावे, ही प्रत्येकाची इच्छा असते. एखाद्या डिझाइनरकडून अंतर्गत सजावट करून घेतली असल्यास घर पाहायला बोलावण्यात अभिमान व हौस दोन्ही असते. वेळ, पैसा व कल्पकता वापरून सजवलेल्या वास्तूत सर्वांत जास्त चर्चा होते ती घरात वापरलेल्या विविध फिनिशिंग मटेरियल्सची, रंगसंगतीची व त्यातून निर्माण होणाऱ्या वेगळेपणाची. स्वतःच्या नकळत सर्व लोक भिंतींना हात लावून त्याची पोत पडताळून पाहत असतात. घरातील सजावटीतील कोणताही भाग नुसता डोळ्यांनी पारखून भागत नाही. फर्निचरच्या प्रत्येक वस्तूला हात लावून पाहिल्याशिवाय मनाचे समाधान होत नाही. या विषयात गती असलेला माणूस नवीन काय वापरले आहे, हे पाहण्यासाठी रस दाखवतो व अंतर्गत सजावट या विषयात गती नसलेला माणूस कुतूहलमिश्रित आदराने घर पाहत असतो. आम्ही करत असलेल्या घर सजावटीत साधारणतः लॅमिनेट विनियर, रंग, वॉलपेपर, काच,



*वॉर्डरोबसाठी व्हिनियर आणि बेडमागची रंगवलेली भिंत.*


टाईल्स, आरसे, कापड, आर्टवर्क या सर्व माध्यमांचा वेगवेगळ्या प्रमाणात वापर करून त्या सजावटीस एक सुसूत्रता आणण्यास मदत करतो. ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे, ज्याच्या त्याच्या आर्थिक क्षमतेप्रमाणे व ज्याच्या त्याच्या राहणीमानावर अवलंबून कमी-जास्त प्रमाणात वरील मटेरियल्सचा वापर करता येतो.

सर्वसाधारणपणे लॅमिनेट व विनियर ही दोन माध्यमे घरातील फर्निचरचे फिनिशिंग करण्यासाठी आवडीची आहेत. दोघांचीही आपापली खास वैशिष्ट्ये आहेत. सामान्यतः ८' x ४' शीट स्वरूपात लॅमिनेट मिळते. यात असंख्य प्रकारची डिझाइन्स मिळू शकतात. प्लेन, टेक्श्चर्ड, ॲबस्ट्रॅक्ट हे सर्व पर्याय लॅमिनेटमध्ये उपलब्ध आहेत. ठराविक बजेटमध्ये अंतर्गत सजावट बसवायची असल्यास लॅमिनेट हा सोयीस्कर पर्याय आहे. आकर्षक रंगछटा व लॅमिनेट यांचा योग्य संगम करून अंतर्गत सजावट सहजपणे नेत्रसुखद दिसू शकते. अर्थात, लॅमिनेट फक्त स्वस्त सजावटीसाठीच वापरता येते, ही चुकीची समजूत आहे. आता आपल्याकडेही परदेशी उच्च दर्जाची उत्पादने मिळू लागली आहेत. स्टील फिनिश व अनेक पोत असलेली ही लॅमिनेट्स महाग आहेत. मात्र, नेत्रदीपक वेगळेपणा आणावयास मदत करणारी आहेत.

## लाकडाला पर्याय

बऱ्याच लोकांना लाकडी फर्निचर घरात असलेले आवडते. घरातील खोल्या मोठ्या असतील तर ते चांगले दिसूही शकते. लाकडाचा बोजडपणा लहान घरातून मात्र नजरेला बोचतो. अशा वेळेस विनियर व लॅमिनेट अशी मिश्र माध्यमे वापरून फर्निचर बनवता येते. 'विनियर' हे प्रत्यक्ष लाकूड वापरण्यापेक्षा स्वस्त व संपूर्ण लॅमिनेट वापरण्यापेक्षा महाग पडते. हुबेहूब लाकडाचा आभास निर्माण करणाऱ्या शीट फॉर्ममध्ये विनियर मिळते. विविध नैसर्गिक लाकडी छटांमध्ये विनियर वापरले जाते. यावर पॉलिशचा हात मारणे अत्यंत जरूरीचे आहे. सध्याच्या ट्रेंडप्रमाणे काळी लाकूड छटा वापरण्याकडे कल दिसून येतो. अर्थात, काळपट लाकूड अतिप्रमाणात वापरले तर लहान खोली अधिक लहान दिसू लागते.

निरनिराळ्या प्रकारची परदेशी लॅमिनेट व विनियर वापरण्याकडे आमचा कल कधीच नसतो. आर्थिकदृष्ट्या ते फायद्याचे होत नाही. वेगवेगळी माध्यमे वापरण्याचा उद्देश हा केवळ दिखावा नसून, वापरातील सोयीस्करपणा व सौंदर्यदृष्टी, हाही आहे. विनियर व लॅमिनेटबरोबर रंग वापरला तर घराला वेगळेच रूप येते. रंग हे असे माध्यम आहे, की सरसकट सर्व घरांमध्ये वापरले जाते. साध्या व स्वस्त डिस्टेम्परपासून ते महागड्या स्प्रे पेंटपर्यंत ज्याच्या त्याच्या खिशाला परवडेल असे व ज्याला त्याला आवडेल अशा रंगछटांत रंग मिळू शकतात. अनेक मोठ्या कंपन्या २ ते ३ हजार रंगछटा बनवतात. या सहज मिळणाऱ्या रंगछटांमुळे 'पेंट फिनिश' हे आमचे आवडते माध्यम आहे. विविध रंग व त्यांचे प्रकार सजावट आल्हाददायक व आकर्षक करण्यास कारणीभूत ठरतात. आम्ही करत असलेल्या अंतर्गत रचनांमध्ये रंग हा अविभाज्य भाग



*फर्निचरमधील बोजडपणा घालविण्यासाठी केलेला आरशांचा वापर.*

आहे. प्रत्येक खोलीतील रंग हा ती खोली वापरणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व, वय व स्वभावावर अवलंबून आहे. शिवाय रंगछटा कोणतीही वापरली तरी किंमत तीच असते, ही महत्त्वाची गोष्ट. २ रुपये प्रति चौरस फूट ते २०० रुपये प्रति चौरस फूट एवढ्या रेंजमध्ये रंग मिळतात; परंतु खासियत ही, की खुबीने व कल्पकतेने वापरले तर हे माध्यम त्याच्या किमतीशी काहीही संबंध ठेवत नाही. योग्य ठिकाणी योग्य प्रमाणात वापरल्यास साध्या गेरूने सारवलेली भिंतही महागड्या पर्ल फिनिश, प्लॅस्टिक इमल्शनपेक्षा अधिक शोभून दिसू शकते.

अंतर्गत सजावटीसाठी वापरली जाणारी अनेक माध्यमे आहेत. CLADDING हा त्यातील अजून एक प्रकार. वॉलपेपर, पातळ दगड, टाईल, आरसे, स्टील वा लाकडी पॅनेलिंग, कापड भित्तिचित्रे हे सर्व क्लॅडिंगचे प्रकार आहेत. अस्तित्वात असलेल्या भिंतीवर हे सर्व वरून चिकटवता येतात. हे माध्यम मात्र अतिशय चोखंदळपणे वापरले पाहिजे. यापैकी कोणतेही क्लॅडिंग जास्त प्रमाणात वापरल्यास ते बटबटीत व कंटाळवाणे होऊ शकते. कमी प्रमाणात वापरल्यास ती डोळ्यांना सलू शकते. कोणत्याही प्रकारचे क्लॅडिंग वापरण्याआधी बॅकग्राऊंड, फोरग्राऊंडचा विचार आवश्यक आहे. अंतर्गत सजावटीचा उद्देश हा घरात सर्व सुखसोयी करून घेणे हा तर आहेच; पण स्वतःभोवती मनाला भावणारी एक वातावरणनिर्मिती करणे, हाही आहे. लॅमिनेट, विनियर, पेंट वा क्लॅडिंग यातील कोणतेही माध्यम एकमेकांस पूरक नसेल तर अंतर्गत सजावट सुसंगत दिसू शकत नाही. वरील सर्व फिनिशिंग मटेरियलचा अतिवापर रचनेला बोजडपणा व निरर्थकता आणू शकते.

फर्निचरमधील बोजडपणा घालविण्यासाठी काच या माध्यमाचा खूप वापर होतो. आपल्याकडे काचही आता विशेष व नावीन्यपूर्ण रूपामध्ये मिळू लागली आहे. अवजडपणा भासणाऱ्या किचन कॅबिनेट व वॉर्डरोबमध्ये काच वापरल्यास त्याला एक हलकेपणा व नेटकेपणा येतो. अनेक तरुण मंडळींच्या घराची अंतर्गत रचना करताना आम्हाला त्यांचा कल काचेच्या वापराकडे झुकत असल्याचे जाणवते. काचेमुळे येणारा स्वच्छ, हलकाफुलका मॉडर्न लुक या लोकांना भावत असावा. अर्थात, काच सांभाळावी फार लागते. संपूर्ण परिवार राहत असलेल्या घरात काचेचा अतिवापर टाळावा. नाही तर आपल्यासाठी घर की घरासाठी आपण, हा प्रश्न सतत पडत राहील. काचेचे फर्निचर जपणे व स्वच्छ ठेवणे, हे अजिबात सोपे काम नाही. आमच्या रचनेत आम्ही टेबलटॉप काचांपेक्षा उभ्या काचा अधिक वापरतो. उभ्या काचेवर धूळ कमी साचते व लवकर स्वच्छ होते, असा आमचा अनुभव आहे.

ठराविक आराखड्यानुसार फर्निचर उभे झाले, की फिनिशिंग मटेरियल ठरवायची वेळ येते. मटेरियल खूप चिकित्सक वृत्तीने ठरवले पाहिजे, कारण हा तुमचा घराचा फायनल मेकअप टच आहे. वरील सर्व माध्यमांच्या योग्य व अचूक संगमानेच तुमची वास्तू उठावदार व सुंदर दिसू शकेल. ■